# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539161, Fax : (0253) 2539163
Website : www.muhs.ac.in, E-mail : establishment@muhs.ac.in

MUHS

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**प्र. कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Offg. Registrar**


क्र. मआविवि/आस्था/७०२८/२०१७ दिनांक :- ०५/०७/२०१७

प्रति,
**मा. कुलसचिव**
**सर्व कृषी व अकृषी विद्यापीठ**
**महाराष्ट्र राज्य**

**विषय :- सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या करणेबाबत...**

महोदय,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे संपुर्ण महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन सुनिश्चित करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाद्वारे स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठाचे मुख्य कार्यालय दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक येथे स्थित असून विद्यापीठाचे विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, कोल्हापुर, औरंगाबाद व नागपुर येथे आहेत. वरील नमूद सर्व विभागीय केंद्र व नाशिक मुख्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी विद्यापीठाच्या स्वनिधीतून तात्पुरत्या स्वरुपात विनिर्दिष्ठ कालावधीसाठी निर्माण केलेल्या खालील पदांवर विद्यापीठ सेवेतून व सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे:

**१) लिपिक वर्गीय :**
**वरीष्ठ सहायक : रु.१५,०००/- इतक्या निश्चित वेतनावर : ३५ पदे**

**२) तांत्रिक वर्गीय :**
**तंत्रज्ञ/सहायक : रु.१५,०००/- इतक्या निश्चित वेतनावर : १२ पदे**

| **विद्यापीठ मुख्यालय, नाशिक** | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदाचा तपशिल | पदसंख्या |
| १ | तंत्रज्ञ (कॉम्प्युटर हार्डवेअर) (Computer Hardware) | ३ |
| २ | तंत्रज्ञ (कॉम्प्युटर सॉफटवेअर) (Computer Software) | ३ |
| ३ | तंत्रज्ञ (कॉम्प्युटर नेटवर्कींग) (Computer Networking) | २ |
| ४ | तंत्रज्ञ (स्थापत्य) (Civil) | १ |
| ५ | तंत्रज्ञ (वातानूकुलीकरण यंत्र देखभाल व दुरुस्ती) (AC Maintenance) | १ |
| ६ | तंत्रज्ञ (विद्युत देखभाल व दुरुस्ती) (Electrical Maintenance) | १ |
| ७ | सहायक (विधी विषयक बाबी) (Legal Matters) | १ |

वरील पदांवर नियुक्तीसाठी आवश्यक अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-

१) अर्जदार महाराष्ट्राचा रहीवासी असावा.
२) मराठी लिहीता वाचता येणे बंधनकारक आहे.
३) शैक्षणिक पात्रता किमान बारावी एवं समकक्ष असावा.
४) अर्जदाराचे वय ६० वर्ष पेक्षा जास्त नसावे.


उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
२ मा. कुलसचिव कार्यालय
12 JUL 2017


DR/Admn

५) शारिरीक दृष्टया सक्षम व चारित्र चांगले असावे.

६) अर्जदारांना लिपिक संवर्गातील तसेच तांत्रिक/सहायक पदांकरीता त्या-त्या क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असावा.

७) स्थानिक उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

८) संगणकावर मराठी/इंग्रजी टंकलेखन कौशल्य असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९) सदर पदांवर नियुक्तीच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या बाबींवर मा. कुलगुरु यांनी घेतलेले निर्णय अंतिम असतील.

१०) उमेद्वाराच्या वयाची ६२ वर्ष पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती संपुष्टात येईल.

यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, या संबंधीची विस्तृत जाहिरात विहीत नमुन्यातील अर्जासह विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर पत्रास योग्य ती प्रसिध्दी देण्यात येवून पात्र उमेद्वारांना आवश्यक त्या दस्तऐवजांच्या मुळ, साक्षांकीत प्रती व विहीत नमुन्यातील अर्जासह मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे ही विनंती.

(डॉ. कालिदास द. चव्हाण)
प्र. कुलसचिव

आवक क्र. २६५५
13 JUL 2017